दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप |
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, | दि. 18 एप्रिल 2025 |
| अंक क्र. 322 | वर्षे 2 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# बनावट कागदपत्रांद्वारे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणी परळी पोलिस स्टेशन मध्ये 14 जणांविरुद्ध गुन्हे दाखल

## परंतु 25 मार्च 2025 रोजीचं प्रमाणपत्र रद्द झाल्याची माहिती

बनावट कागदपत्रांद्वारे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळवून शासनाची फसवणूक प्रकरणी परळी पोलिस स्टेशन मध्ये 14 जणांविरुद्ध गुन्हे दाखल

या प्रकरणी परळी तहसीलचे सहाय्यक महसूल अधिकारी व्यंकट जयराम सुर्यवाड यांच्या फिर्यादीवरून तक्रार दाखल करण्यात आली आहे.

यापूर्वीच म्हणजे दिनांक 25 मार्च 2025 रोजीच जन्ममृत्यू प्रमाणपत्र रद्दबाबत आदेश काढण्यात आलेले आहेत

परळी - प्रतिनिधी

परळी तहसील येथील व्यंकट जयराम सुर्यवाड (सहाय्यक महसूल अधिकारी), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जि. बीड, यांच्या प्राधिकृतीने सरकार तर्फे खालीलप्रमाणे तक्रार नोंदवली आहे: खालील नमुद 01 ते 14 इसमांनी सन 2024 मध्ये तहसील कार्यालय परळी वैजनाथ येथे खोटे कागदपत्रे सादर करुन शासनाची फसवणूक करुन व ते परळीचे रहिवाशी कोणतेही योग्यते कागदपत्रे सादर न करता जन्म/ मृत्यूप्रमाणपत्र असे दस्त ऐवज काढुन फसवणूक केली या प्रकरणी त्यांच्यात विरुद्र परळीत पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### तपासणीत एकूण 14 संचिकांमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी व अनियमितता आढळून आल्या:

- 1. खोटे पत्ते दाखवून परळीचे रहिवासी असल्याचे भासवणे.
- 2. दोन अर्जांमध्ये अर्जदारांच्या स्वाक्षऱ्यांमध्ये तफावत.
- 3. शपथपत्र विनास्वाक्षरी सादर करणे.
- 4. आधार, मतदान कार्ड इ. रहिवासी पुरावे इतर तालुक्याचे असणे.
- 5. डॉक्टरांचे अनधिकृत प्रमाणपत्र सादर करणे.
- 6. चुकीची किंवा बनावट माहिती अर्जात देणे.

### शासनाच्या आदेशानंतर फेरतपासणी

- महसूल-2 नायब तहसीलदार यांनी दिलेली जन्म/मृत्यू प्रमाणपत्रे 5.03.2025 रोजी रद्द करून फेरतपासणी सुरू करण्यात आली. या प्रकरणी एकूण 14 अर्जदारांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आल्या आहेत त्यात काही अर्जदारांनी परस्परविरोधी किंवा अपुरे कागदपत्रे सादर करून शासनाची दिशाभूल केली. यामध्ये प्रत्येक अर्जदाराचे नाव, रहिवासी पत्ता, त्यांनी सादर केलेली कागदपत्रे व त्यातील तफावत याची नोंद आहे. तहसील कार्यालयामार्फत सन 2024-25 मध्ये विलंबाने जन्म/मृत्यू प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली. परंतु मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वये दिनांक 25.03.2025 रोजी ती प्रमाणपत्रे रद्द करून संचिकांची फेरतपासणी करण्यात आली.

### संचेकेच्या फेर तपासणीनंतर आढळून आलेली माहिती.

- 1. परळी वै. तालुक्याचे रहिवाशी नसताना परळी वै. येथील रहिवासी आहे असा अर्ज सादर करुन सोबत इतर तालुक्याचे/जिल्हयाचे ओळखीचे पुरावे आहेत.
- 2. एकच अर्जदार असताना दोन अर्जात अर्जदार यांच्या स्वाक्षरीमध्ये तफावत.
- 3. अर्जात परळी/सिरसाळा येथील रहिवासी असल्याचे नमुद केले व तसे शपथपत्र सादर करुनही एकही ओळखीचा/रहिवासी पुरावा सादर केलेला नाही.
- 4. जन्म नोंदीचा दाखला देण्याचे अधिकार नसणाऱ्या डॉक्टरचे प्रमाणपत्र सादर केली व अनेक वर्षांपूर्वीचे जन्माची नोंदीची Birth Certificate 2024/2025 मध्ये सादर केले.
- 5. शपथपत्र विनास्वाक्षरी सादर केले.

- संचिका क्रमांक 834 अर्जदार सुमीत विजयकुमार झंवर,
- संचिका क्रमांक 251 अर्जदार वैखेमुंनबी इसामशहा सय्यद
- संचिका क्रमांक 891 अर्जदार सुनिल मारोती कांबळे,
- संचिका क्रमांक 487 अर्जदार शेख गुलाम हबीब, गुलाम मुस्तफा,
- संचिका क्रमांक 979 अर्जदार महीबीशबेगम सिध्दीक आली शेख,
- संचिका क्रमांक 1086 अर्जदार शेख गफ्फार सत्तार,
- संचिका क्रमांक 1087 अर्जदार शाहीनबेगम युसुफ बक-यावाले,
- संचिका क्रमांक 1088 अर्जदार राजीव प्रकाश फड,
- संचिका क्रमांक 1090 अर्जदार फेरोज खा इसाक खा पठाण,
- संचिका क्रमांक 1093 अर्जदार शेख अजहर शेख वहीदोद्दीन,
- संचिका क्रमांक 1094 अर्जदार नितीन राजाभाऊ पौळ,
- संचिका क्रमांक 845, संचिका क्रमांक 839 व
- संचिका क्रमांक 838 सर्वांचे अर्जदार एकच अलीम अब्दुल सय्यद असे 12 अर्जदार यांनी जन्म प्रमाणपत्र व 1.संचिका क्रमांक 1089 अर्जदार शेख फारुख खमरोद्दीन, 2. संचिका क्रमांक 1091 अर्जदार मो. अबदुस समंदखान खालेद पि.मो. अब्दुल रहेमान खान अशा 2 अर्जदार यांचे मृत्यु प्रमाणपत्र अशा अर्जदार यांच्या संचिका आढळुन आल्या.
- वरीलप्रमाणे अर्ज (संचिका) क्रमांक 834, 251, 891, 487, 979, 1086, 1087, 1088, 1090, 1093, 1094, 845, 839, 838, 1089 व 1091 या अर्जदारांनी शासनाची दिशाभूल करून बनावट कागदपत्रांद्वारे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्याचा प्रयत्न केला.
- काही व्यक्तींनी तहसील कार्यालय परळी वैजनाथ येथे खोट्या दस्तऐवजांच्या आधारे जन्म/मृत्यू प्रमाणपत्रे मिळवले.


- शपथपत्र आणि सादर केलेले इतर कागदपत्रे पाहता सकृतदर्शनी या संचीका अपात्र असल्याचे दिसुन आले आहे. अर्जदारांनी बेकायदेशिररित्या शासनाची दिशाभूल करुन काही कागदपत्रे मिळवली चुकीची माहीती व खोटया शपथपत्रासह अर्ज केला अशीही माहिती तक्रारी वरून समजते.
- तहसील कार्यालय येथील संकिर्ण विभागाच्या महसुल सहाय्यक डिंगाबर शिनगारे यांनी वरील सर्व 14 अर्जदार यांचे अर्जाची सविस्तर छाणणी केली असता
- 1) संचिका क्रमांक 834 श्री. सुमित विजयकुमार झंवर रा. परळी यांचे संचिकेत नगरपालीका परळी यांचे अर्जदार राधाकिसन रघुनाथ जाजु या नावाने प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यांनी अर्जासोबत सादर केलेले ओळखपत्र विशाखापटनम आंध्रप्रदेश येथील रहीवाशी असल्याचे दिसुन आले असून त्यांनी परळी वै. येथील कोणताही ओळखीचा / रहिवासी पुरावा जन्म नोंदीचा पुरावा अर्जदार यांनी सादर केलेला नाही.
- 2) संचिका क्रमांक 251 वैखेमुंनबी इसामशहा सय्यद, रा. परळी यांचे कागदपत्र अवलोकन केले असता निलंगा जि. लातुर येथील रहिवास असुन जन्म प्रमाणपत्र परळी वै. येथुन हस्तगत केले आहे.
- 3) संचिका क्रमांक 891 अर्जदार सुनिल मारोती कांबळे रा. सिरसाळा यांचे कागदपत्राचे अवलोकन केले असता जन्माचे प्रमाणपत्र बी. ए. एम. एस. डाँक्टरांचे रहिवास माजलगाव जि. बीड येथील असुन त्यांनी अर्जासोबत सादर केलेले मतदानकार्ड / आधारकार्ड ओखळपत्र ता. माजलगाव जि.बीड येथील जोडले आहे. व जन्म प्रमाणपत्र परळी येथुन घेतले आहे.
- 4. संचिका क्रमांक 487 अर्जदार शेख गुलाम हबीब गुलाम मुस्तफा रा. सिरसाळा यांचे टी. सी. वर जन्मस्थळ सिरसाळा ता. माजलगाव येथील असुन शपथपत्रावर राहते घरी परळी येथे जन्म झाल्याचे नमुद आहे त्यामुळे अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये तफावत दिसुन येते.
- 5) संचिका क्रमांक 979 अर्जदार महीबीशबेगम सिध्दीक आली शेख रा. परळी याचे आधार कार्ड, मतदान कार्डवर कारेगाव रोड, ता. धर्माबाद जि. नांदेड येथील रहीवाशी असुन सदर अर्जावर परळी येथील रहीवाशी असल्याचे नमुद केले आहे.
- 6) संचिका क्रमांक 1086 अर्जदार शेख गफ्फार सत्तार रा. परळी यांचे रहीवाशीचे पुरावा उपलब्ध नाही. अर्जात व शपथपत्रात राहते घरी परळी येथे जन्म झाल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रा मध्ये तफावत दिसुन येते.
- 7) संचिका क्रमांक 1087 अर्जदार शाहीनबेगम युसुफ बक-यावाले रा. परळी याचे आधारकार्ड वर रहीवास ता. चाकुर जिल्हा लातूर येथील नमुद आहे. अर्ज व शपथपत्रावर राहतेघरी परळी येथे जन्म झाल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रा मध्ये तफावत दिसुन येते.
- 8) संचिका क्रमांक 1088 अर्जदार राजीव प्रकाश फड रा. परळी याचे टी. सी.,आधारकार्ड, मतदानकार्ड यावर पारधवाडी ता. सोनपेठ जि. परभणी रहीवास असुन त्यांनी राहते घरी परळी येथे जन्म झाल्याचे अर्ज व शपथपत्रात नमुद केले आहे.
- 9) संचिका क्रमांक 1090 अर्जदार फेरोजखा इसाकखा पठाण रा. सिरसाळा यांचे शपथपत्रावर अर्जदार यांची स्वाक्षरी नाही तसेच अर्ज व शपथपत्रावर रहीवास परळीचा दाखवुन जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र सिरसाळा येथील दाखल केले आहे.
- 10 ) संचिका क्रमांक 1093 अर्जदार शेख अजहर शेख वहीदोद्दीन रा. सिरसाळा याचे आधारकार्डवर रहिवास इस्लामपुरा बीड येथील असुन वैदयकिय अधिकारी सिरसाळा यांचे जन्म नोद प्रमाणपत्रावर खाडाखोट आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रा मध्ये तफावत दिसुन येते

उर्वरीत पान 3 वर

- यापूर्वीच दिनांक 25 मार्च 2025 रोजीच जन्ममृत्यू प्रमाणपत्र रद्दबाबत आदेश काढण्यात आलेले आहेत
- यापूर्वीच जन्म व मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीसंदर्भात शासनाकडे मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या.
- "संदर्भ मा. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचे राजपत्र दि. ११.०८.२०२३.रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मध्ये कलम ११ (२) व ३ मध्ये सुधारणा केली असुन जन्म मृत्युच्या तारखेपासुन १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये विलंबाने जन्म मृत्युची नोंद आदेशाबाबत निर्देशीत करण्यात आले होते.





क्र.२०२५/जन्म मृत्यु नोंद/कावी दिनांक २५.०३.२०२५

आदेश

ज्याअर्थी मा.भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचे राजपत्र दि.११.०८.२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मध्ये कलम ११ (२) व ३ मध्ये सुधारणा केली असुन जन्म मृत्युच्या तारखेपासुन १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये जन्म मृत्युची नोंद करणे बाबत रास्त कार्यवाही करुन आदेश देणे कामी तहसिलदार यांना प्राधिकृत करण्यात आले होते. संदर्भ क्र. ०३ अन्वये प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मध्ये कलम ११ (२) व ३ मध्ये सुधारणा केली असुन जन्म मृत्युच्या तारखेपासुन १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये जन्म मृत्युची नोंद करणे बाबत अनुषंगीक कार्यवाही करुन आदेश देणे कामी नायब तहसीलदार महसुल तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले होते. व नायब तहसिलदार महसूल यांचे कडील जन्म – मृत्यु नोंद आदेशाबाबत कार्यवाही करण्यात आलेली होती.

त्याअर्थी संदर्भ क्र.०४ अन्वये भारत शासन राजपत्राद्वारे जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ मध्ये सुधारणा करुन उशीरा जन्म मृत्यु नोंद नोंदणी संबंधीचे अधिकार हे जिल्हाधिकारी / उप विभागीय अधिकारी यांना प्रधान करण्यात आले आहेत. या सुधारणेनुसार उशीरा जन्म व मृत्यु प्रमाणपत्र देण्याबावत करण्यात आलेल्या कार्यवाहीसंदर्भात शासनाकडे मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींची चौकशी करणेकरिता गृह विभागामार्फत विशेष तपासणी पथकाची (SIT) स्थापन करण्यात आलेली आहे. सबब उपरोक्त सुधारणेनुसार उशीरा जन्म व मृत्यु प्रमाणपत्र वितरित कार्यवाही पुढील आदेशापर्यंत करण्यात येऊ नये असे संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.

त्यअनुषंगाने संदर्भ क्र. ०४ नुसार जन्म व मृत्यु प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही या कार्यालयाच्या हद्दीपर्यंत स्थगीत करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र.०६ अन्वये प्राप्त निर्देशानुसार या कार्यालयातुन निर्गमित दिनांक ०२.०२.२०२४ ते २१.०१.२०२५ या कालावधी दरम्यान नायब तहसिलदार महसूल यांचे स्वाक्षरीने निर्गमित झालेले सर्व जन्म मृत्यु नोंद आदेश दिनांक २५.०३.२०२५ अन्वये मी तहसिलदार परळी वै. जि.बीड रद्द करत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी संबंधीत सर्व आस्थापणा यांनी तात्काळ आमलात आणावी.

तहसिलदार परळी वै.

प्रतिलीपी :-
१. मा.जिल्हाधिकारी,बीड यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२. मा.उपविभागीय अधिकारी,परळी वै.यांना माहीतीस्तव सविनय सादर.
३. मुख्याधिकारी नगर परिषद परळी वै. यांना तात्काळ कार्यवाहीस्तव देण्यात येवून आदेशीत करण्यात येते आदेशात नमुद कालावधीतील जन्म मृत्यु नोंद रद्द करुन अनुपालन अहवाल सादर करावा.
४. ग्रामपंचायत अधिकारी तथा निबंधक जन्म मृत्यु ग्रामपंचयत कार्यालय .................................. ता.परळी वै. जि.बीड यांना तात्काळ कार्यवाहीस्तव देण्यात येवून आदेशीत करण्यात येते आदेशात नमुद कालावधीतील जन्म मृत्यु नोंद रद्द करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

तहसिलदार परळी वै.
तहसीलदार,परळी वै

# आबासाहेब खिलारे यांना राज्य शासनाचा आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर

आष्टी :प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी आबासाहेब खिलारे यांना महाराष्ट्र शासनाचा सन २०२२-२३ चा राज्यस्तरीय आदर्श ग्रामविकास अधिकारी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.बीड जिल्ह्यातून हा एकमेव पुरस्कार मिळाला आहे.

जिल्हा परिषद स्तरावर अतिउत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना शासन स्तरावरून यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कार देऊन दरवर्षी गौरविण्यात येते. गेल्या दोन वर्षापासून या पुरस्काराचे वितरण झाले नव्हते. यावर्षी 2022-23 चा आदर्श ग्राम विकास अधिकारी पुरस्कार कडा येथील ग्राम विकास अधिकारी आबासाहेब खिलारे यांना



जाहीर करण्यात आला आहे. आबासाहेब खिलारे यांनी ग्रामविकास अधिकारी म्हणून काम करताना गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले आहेत. कडा हे शहर स्मार्ट ग्राम करण्यामध्ये खिलारे यांचा मोलाचा वाटा होता. यामध्ये सार्वजनिक उद्यान ,बॅडमिंटन हॉलची उभारणी, वॉकिंग ट्रॅक ,ओपन जिम, उभारण्यात आले. ओला कचरा व शेणा पासून गॅस निर्मिती करण्यासाठी गोबरधन प्रकल्प तयार करण्यात आले. सांडपाण्याची दूरदृष्टी ठेवून पहिल्यापासून भूमिगत नालीसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर काम केले. याशिवाय वृक्ष लागवड व संगोपनाची जबाबदारी ,गावांतर्गत सफाई डासमुक्त अभियान, राष्ट्रीय सेवा योजनेचे आयोजन करणे, महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे, व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी कडा शहरांमध्ये खेळाच्या सुविधा तयार करून देणे इत्यादी महत्त्वाच्या बाबी त्यांनी ग्रामविकास अधिकारी म्हणून पार पाडल्या. या कामाची दखल घेऊन राज्य शासनाने त्यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी हा पुरस्कार जाहीर केला आहे. त्यांच्या या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# आत्मक्लेश आंदोलन व नुतन कार्यकारणी संदर्भात काँग्रेसची परळीत शनिवारी बैठकीचे आयोजन

## जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे,पक्ष निरीक्षक अमर खानापुरे यांची राहणार उपस्थिती-प्रभारी शहराध्यक्ष बहादूरभाई

परळी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार राज्यभर आत्मक्लेश आंदोलन आंदोलन करण्यात येणार असून त्या तयारी संदर्भात व नवीन कार्यकरणी करण्याबाबत बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे,पक्ष निरीक्षक अमर खानापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले असुन या बैठकीला काँग्रेस पक्षाच्या सर्व



आघाडी, सेलच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रभारी शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी केले आहे.

शनिवार दि.19 एप्रिल 2025 रोजी सकाळी 11.30: वाजता इम दादूल उलूम स्कूल पावर हाऊस जवळ या ठिकाणी " आत्मक्लेश आंदोलन " संदर्भात व तसेच परळी तालुका काँग्रेस कमिटी व परळी शहर काँग्रेस कमिटीच्या नविन कार्यकारणी निवडी संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या बैठकीस बीड जिल्हा काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष राहुल भैया सोनवणे साहेब , पक्ष निरीक्षक अमरजी खानापुरे साहेब यांच्यासह वरीष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी परळी तालुका व शहर कार्यक्षेत्रातील सर्व आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, इच्छुक सहकाऱ्यांनी वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन प्रभारी शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी केले आहे.

# नरेंद्र बोरकर : अपंगत्वावर मात

अपघातामध्ये एक पाय गमावल्यानंतरही माणसे फिनिक्स पक्षाप्रमाणे आयुष्यामध्ये उभी राहतात आणि आपल्या कर्तुत्वाने आपल्या मित्रमंडळीमध्ये कर्तृत्वाचा ठसा उमटवत असतात.अशी बरीचशी माणसे आपल्याला पाहायला मिळतील. आमच्या मित्रमंडळीमध्ये असाच एक माणूस आहे त्याचे नाव आहे नरेंद्र बोरकर. तो आमचा मित्र तर आहेच पण भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री भूषण गवई यांचा वर्ग मित्र आहे . न्यायमूर्ती श्री भूषण गवई जेव्हा सुरुवातीला अमरावतीला ज्या फ्रेझरपुरा या भागामध्ये राहत होते त्याला लागून असलेल्या किशोरनगरमध्ये श्री नरेंद्र बोरकर यांचे राहणे होते. न्यायमूर्ती श्री भूषण गवई आणि नरेंद्र बोरकर यांनी अमरावतीच्या केशरबाई लाहोटी महाविद्यालयात डी बी एम हा कोर्स सोबतच केला. श्री गवईसाहेब यांच्याकडे तेव्हा फियाट कार होती. काही वेळा ते श्री बोरकर यांना घ्यायला यायचे व सोबत मिळून कॉलेजमध्ये जायचे. या मित्र परिवारामध्ये एक नाव अजून होते ते म्हणजे विजय आचलिया यांचे. श्री गवई साहेब आणि आचलिया एका बेंचवर आणि त्यांच्या मागे बोरकर असा बसण्याचा क्रम होता. परवा श्री भूषण गवईसाहेब जेव्हा अमरावतीला आले आणि दारापूरच्या कार्यक्रमात श्री नरेंद्र बोरकर त्यांना दिसला. तेव्हा आठवणीने त्यांनी जवळ बोलावले आणि फोटोग्राफरला फोटो काढायला सांगितले.

श्री नरेंद्र बोरकर सात एम डी एम एस डॉक्टरांना एकत्र करतो. ग्लोबल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल उभारतो. प्रत्येक डॉक्टरला सगळ्या प्रकारच्या केबिन सगळ्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देतो. मा. लेडी गव्हर्नर व न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या मातोश्री श्रीमती कमलताई गवई व खासदार डॉ.अनिल बोंडे यांना उद्घाटनाला बोलावतो. एका मोठ्या उपक्रमाचा उद्घाटन समारंभ घडवून आणतो. कुठेही आपले नाव नाही .कुठेही आपले गाव नाही. नाहीतर आजकाल प्रत्येक माणूस स्वतःच्या नावासाठी धडपडत असतो. सात एम डी एम एस डॉक्टरांना एकत्र आणणे म्हणजे सोपे काम निश्चितच नाही. पण नरेंद्र बोरकर यांनी ते सिद्ध करून दाखवले आहे .कारण पाय जरी तुटलेला असला तरी मन चंगा तो काठोप मे गंगा असे म्हणतात ना त्याप्रमाणे त्यांचे आहे .

कवी श्रेष्ठ सुरेश भटांचा 1980 साली आम्ही फार मोठा कार्यक्रम अमरावतीच्या नगर वाचनालय मध्ये घेतला होता. असा कार्यक्रम त्यापूर्वी व त्यानंतर महाराष्ट्रात झाला नाही.अमरावतीच्या इतिहासात या कार्यक्रमाची नोंद झाली. 1980 साली वर्तमानपत्राच्या पुरवण्या काढणे हा खूप मोठा प्रकार होता. फार तुरळक पुरवण्या निघायच्या. तेव्हा एका दैनिकाने चार पानांची व एका इंग्रजी दैनिकाने एक पानाची पुरवणी



काढण्याचे ठरविले होते. मजकूर जुळून झाला होता . वर्तमानपत्रांना बातम्या जाहिराती सुरू होत्या.

मी कार्यक्रमाचा मुख्य संयोजक होतो. कवी श्रेष्ठ श्री सुरेश भट यांचे जवळचे मित्र डॉ मोतीलाल राठी अरविंद ढवळे मीनाताई ढवळे रामदास भाई श्रॉफ वली सिद्दिकी दादा इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण राबवत होतो. तेवढ्यात एक तरुण माझ्याजवळ आला. नरेंद्र बोरकर त्याचे नाव .तो म्हणाला सर मला माझ्या वर्तमान पत्रासाठी एक पृष्ठाची पुरवणी या कार्यक्रमाच्या निमित्ताने पाहिजे आहे. ते वर्तमानपत्र इंग्रजी होते. नागपूरवरून निघत होते.एका पानाचे तेव्हाचे रेट काय कमी नव्हते. कार्यक्रमाला तिकीट होते तीन रुपये. पण त्या तीन रुपयाला तेव्हा किंमत होती. मी चक्क नकार दिला. जाहिरातीची एवढे मोठे रक्कम उभारणे मला अशक्यप्राय वाटत होते .पण तो तरुण मागेच लागला आणि मला म्हणाला सर ही जर पुरवणी मला मिळाली ना तर माझी जिल्हा प्रतिनिधी ही नियुक्ती पक्की होते. स्पर्धेमध्ये अजून एक दोन लोक आहेत .पण कवी श्रेष्ठ श्री सुरेश भटांच्या कार्यक्रमाची पुरवणी आणेल त्याला जिल्हा प्रतिनिधी त्या दैनिकाचे नियुक्त केले जाणार आहे .सर माझ्या नोकरीचा प्रश्न आहे. मी त्याच्या डोळ्याकडे पाहिले. आमचे पितामह व कवी श्रेष्ठ सुरेश भटांचे जिवलग मित्र डॉक्टर मोतीलाल राठी यांना फोन केला आणि त्यांना वस्तुस्थिती सांगितली. ते म्हणाले तथास्तु. झाले एका पानाची इंग्रजी दैनिकाची पुरवणी त्या तरुणाला मी दिली. आज तोच तरुण स्वतःच्या पायावर उभा राहिला एवढ्याच नव्हे तर कोट्यावधी रुपये खर्च करून त्याने ग्लोबल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल उभारले आणि अनेकांना रोजगार दिला.

असे हे नरेंद्र बोरकर हे व्यक्तिमत्व आहे रोज सकाळी लवकर उठणे . विद्यापीठात फिरायला जाणे. स्वतः गाडी चालवणे .एक पाय गेला असला तरी दुसऱ्या चांगल्या पायाच्या सहकार्याने व नकली पायाच्या आधाराने ते स्वतः चार चाकी गाडी चालवतात. अमरावती मधल्या वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. अपंग आणि दिव्यांग असलेल्या व्यक्तींनी नरेंद्रचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. ज्या तरुणाला एका पानाची पुरवणी मिळवण्यासाठी द्राविडी प्राणायाम करावा लागले आज तोच तरुण अनेकांना पुरवण्या देणारा झाला आहे. मदत करणारा झाला आहे .परोपकारी झाला आहे.

सर्वात महत्त्वाचे नरेंद्र बोरकर तुम्हाला भेटले तर ते एका पायाने अपंग आहे हे तुम्हाला जाणवणारच नाही. सर्वांमध्ये मिसळणारा सर्वांशी प्रेमाने बोलणारा आणि अडचणीला सार्वजनिक कामात धावून जाणारा नरेंद्र बोरकर आमचा जवळचा मित्र आहे. रोज नियमितपणे तो आमच्या अमरावती विद्यापीठाची मॉर्निंग ग्रुपच्या क्लबला येतो .आमच्याबरोबर व्यायाम करतो हसतो गातो खेळतो .कुठेही आपल्या अपंग असल्याची जाणीव व भासू देत नाही. 18 एप्रिलला वाढदिवस आम्ही अमरावती विद्यापीठाच्या श्री संत गाडगेबाबा अध्यासनाच्या परिसरामध्ये साजरा करीत आहोत. त्यासाठी आम्ही सर्वांनी वाढदिवसानिमित्त झाडे विद्यापीठाला द्यायचे ठरवले आहे. कार्यक्रमाला मा. लेडी गव्हर्नर डॉक्टर श्रीमती कमलताई गवई तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सहकारी व अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे सर्वेसर्वा श्री जनार्दन पंत बोथे तसेच श्री संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख प्राचार्य डॉक्टर दिलीप काळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमातून इतरांना प्रेरणा मिळावी. वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या बाबींना उजाळा मिळावा सातत्याने ह्या गोष्टी सुरू राहाव्या या उदात्त हेतूने व इतरांना प्रेरणा मिळण्याच्या दृष्टिकोनातून या कार्यक्रमाचे नियोजन आम्ही केलेले आहे. आमचा हा मित्र मनाने अपंग नाही .शरीराने अपंगत्व येऊ शकते पण त्याने मात केली आहे.



लेखक प्रा.डॉ.नरेशचंद्र काठोळे
संचालक मिशन आयएएस

# संपादकीय

## ‘हार्ड वर्क’चा आनंद!

अमेरिकेचे दुसरे अध्यक्ष जॉन ॲडम्स, नंतरचे थिओडोर रुझवेल्ट, फ्रँकलिन डी रुझवेल्ट, जे. एफ. केनेडी, बराक ओबामा असे एक नाही दोन नाही तर तब्बल आठ अध्यक्ष, तत्त्वज्ञ हेन्री थोरो, वैज्ञानिक रुदरफोर्ड, ओपेनहायमर, ‘रोड लेस ट्रॅव्हल्ड’ लिहिणारे कवी रॉबर्ट फ्रॉस्ट, दृष्टिहीनांसाठी बरेच काही करणाऱ्या हेलेन केलर, कवी टी. एस. एलियट, हेन्री किसिंजर, बेनझीर भुत्तो, अल गोर, बिल गेट्स, ‘फेसबुक’चा जन्मदाता मार्क झकरबर्ग, रतन टाटा, राहुल बजाज, पी. चिदम्बरम, आनंद महिंद्रा, चित्रपट निर्मात्या मीरा नायर इत्यादी किती नावे सांगावीत! या सर्वांस जोडणारा एक समान धागा आहे. तो म्हणजे हार्वर्ड विद्यापीठ. आपल्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्य-स्वप्न प्रत्यक्षात आणणारी मोहीम सुरू होण्याआधी, म्हणजे १६३६ साली अमेरिकेत हे विद्यापीठ प्रत्यक्षात आले. इंग्लंडातून जीव वाचवण्यासाठी अमेरिकेत आलेल्या शिक्षक जॉन हार्वर्ड यास अमेरिकेत अकाली मृत्यूने गाठले. त्या वेळी मृत्युशय्येवरून अखेरची इच्छा त्याने व्यक्त केली ती अशी एखादी शैक्षणिक संस्था काढण्याची. ती प्रत्यक्षात आली तेव्हा अमेरिकेचा जन्म १४० वर्षे दूर होता. याचा अर्थ हे विद्यापीठ वयाने अमेरिकेसही थोरले. आणखी ११ वर्षांनी ते चतुर्थ शताब्दी साजरी करेल. या काळात तब्बल १४९ नोबेल पारितोषिक विजेते, मानवी संस्कृती पुढे नेणारे जगभरातील अनेक प्रज्ञावंत, वैज्ञानिक, साहित्यिक या विद्यापीठाच्या मांडवाखालून गेले. अशी शिक्षण संकुले म्हणजे अमेरिकेने स्वकर्तृत्वाने, स्वकष्टाने स्वतःच्या हातावर स्वहस्ते कोरलेल्या भाग्यरेषाच जणू. शिक्षणावर, संस्कृतीवर आणि मुख्य म्हणजे सुसंस्कृततेवर प्रेम करणाऱ्या जगातील प्रत्येकास आज यातील मेरुमणी हार्वर्डविषयी अभिमानाची भावना दाटून आली असेल. याचे कारण शिक्षणशत्रू धनदांडग्या डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर नमते घ्यायला या विद्यापीठाने दिलेला ठाम नकार.

हुकूमशाही प्रवृत्तीचा नेता कोणत्याही देशात, कोणत्याही धर्मात आणि कोणत्याही संस्कृतीत असो. त्याचा पहिला राग असतो तो स्वतंत्र शिक्षण संस्थांवर. कारण अशा स्वतंत्र शिक्षण संस्थांतूनच उद्याचे प्रतिभावंत आकारास येत असतात आणि त्यांच्याकडून हुकूमशाही प्रवृत्तीच्या नेत्यांस धोका असतो. म्हणून अशा नेत्यांस हव्या असतात होयबांची पैदास करणाऱ्या साच्यातील मूर्तिशाला. यास; अमेरिकेसारख्या कमालीच्या स्वतंत्र हवेत जन्माला येऊनही ट्रम्प अपवाद नाहीत. आपली प्रदूषित मानसिकता आणि त्याहूनही प्रदूषित विचारसरणी त्यांनी हार्वर्ड विद्यापीठावर लादण्याचा प्रयत्न केला. या विद्यापीठातील विद्यार्थी चळवळी दंतकथा वाटाव्यात इतक्या खऱ्या. इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष असो वा पारलैंगिकता वा अभिव्यक्तिस्वातंत्र्य वा अन्य काही. या विद्यापीठातील विद्यार्थी प्राणपणाने संघर्ष करतात. ट्रम्प यांस हे मान्य नाही. विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांस वेसण घालावी असा फतवा त्यांनी काढला. ज्यू धर्मविरोधी (अँटीसेमाईट) भावना या विद्यापीठात वाढीस लागल्याचे दिसते, सबब विद्यापीठाने या विद्यार्थ्यांचे कडक नियमन करावे, त्यांच्या अभ्यासेतर चळवळींवर नियंत्रण आणावे आणि अशा चळवळ्या विद्यार्थ्यांची माहिती सरकारहाती द्यावी, असा ट्रम्प यांचा आदेश. अमेरिकेत भिन्नतेला महत्त्व खूप. भिन्नवर्णीय, भिन्नधर्मीय, भिन्नलिंगी अशांस सर्वांस समान संधी कशा मिळतील असा प्रशासनाचा प्रयत्न. तो ट्रम्प यांस अमान्य. अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून ही भिन्नता कशी समूळ नष्ट करता येईल असा त्यांचा प्रयत्न आहे. विद्यापीठाने ही भिन्नता सोडावी असे त्यांनी बजावले आणि सर्व परदेशी विद्यार्थ्यांचा तपशील सरकारदरबारी सुपूर्द करावा असाही आदेश काढला. गेल्या शुक्रवारी विद्यापीठास प्रशासनाकडून हे पाच पानी आज्ञापत्र सादर केले गेले.

सोमवारी विद्यापीठाचे अध्यक्ष ॲलन एम गार्बर यांनी त्यास प्रत्युत्तर दिले आणि ट्रम्प यांच्या आदेशवाणीस विद्यापीठ केराची टोपली दाखवत असल्याचे जाहीर केले. ‘‘विद्यापीठाने काय शिकवावे, कसे वागावे, कोणते अभ्यासक्रम आखावेत आणि कोणते आखू नयेत, विद्यार्थ्यांना कसे वागवावे वगैरे सांगण्याचा प्रशासनास काडीचाही अधिकार नाही. आपल्या



प्रशासनाने काढलेले आदेश हे मर्यादाभंग आहेत. अमेरिकी घटना नागरिकांस, संस्थांस जे स्वातंत्र्य देते त्यावर आपल्या आदेशाने गदा येते. आम्ही ते पाळणार नाही’’, इतक्या स्पष्टपणे हार्वर्ड विद्यापीठाने आपल्या अध्यक्षास शब्दशः खुंटीवर टांगले. याचे पडसाद केवळ शैक्षणिक वर्तुळातच नव्हे तर अमेरिकेच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही उमटले असून माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्यासह अनेकांनी हार्वर्डचे अभिनंदन केले. ‘‘हा ट्रम्प यांच्या राजवटीस कलाटणी देणारा क्षण’’, अशी भविष्यवाणी अमेरिकेत यानंतर केली जात असून गार्बर यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होताना दिसतो. अध्यक्ष ट्रम्प यांना हे सहन होणे अर्थातच अशक्य. त्यांनी स्वतः यावर काही भाष्य केले नसले तरी त्यांच्या वतीने प्रशासनाने हार्वर्डविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रशासन तेथेच थांबले नाही. त्यानंतर लगेच विद्यापीठाचे तब्बल २२० कोटी डॉलर्सचे अनुदान थांबवण्याचा निर्णय ट्रम्प प्रशासनाने जाहीर केला. या विद्यापीठास अमेरिकी सरकारकडून ९०० कोटी डॉलर्स येतात. त्यापैकी ७०० कोटी डॉलर्स विद्यापीठाच्या बोस्टन, केंब्रिज, मॅसेच्युसेट्स इत्यादी ठिकाणची रुग्णालये आणि वैद्याकीय संस्थांतील संशोधनावर खर्च होतात. अल्झायमर्स, मधुमेह, कर्करोग इत्यादी गहन विकारांवर या केंद्रातून महत्त्वाचे संशोधन सुरू आहे. असे असतानाही केंद्रीय सरकारकडून विद्यापीठास दिल्या जाणाऱ्या रकमेतील जवळपास एकपंचमाश रक्कम गोठवण्याचा निर्णय ट्रम्प घेतात. यावरून त्यांची असंवेनशीलता आणि अक्षरशत्रुत्व तेवढे दिसून येते.

तरीही विद्यापीठाने अध्यक्षांच्या मनमानीपुढे मान तुकवण्यास नकार दिला, ही बाब कमालीची महत्त्वाची. विशेषतः कोलंबिया विद्यापीठाने ट्रम्प प्रशासनासमोर अलीकडेच नांगी टाकली हे वास्तव असताना हार्वर्डचे हे शौर्य सर्वार्थाने कौतुकास्पद ठरते. कोलंबियाचे ४० कोटी डॉलर्सचे अनुदान रोखण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला आणि ते विद्यापीठ सरकारशी चर्चा करण्यास तयार झाले. हार्वर्ड विद्यापीठास मात्र अशी चर्चेची कोणतीही गरज वाटली नाही. त्यांनी सरळ ट्रम्प यांचा आदेश धुडकावूनच लावला. या विद्यापीठाची महती अशी की गेल्या एका वर्षातच, २०२४ साली, त्यास परदेशातून जवळपास ५३०० कोटी डॉलर्स देणगी रूपात मिळाले. आपल्या रतन टाटा यांनीही साधारण १५ वर्षांपूर्वी नव्या इमारत बांधणीसाठी या विद्यापीठास तब्बल पाच कोटी डॉलर्सची देणगी दिली आणि सध्या विद्यामान सत्ताधीशांचे आनंददूत मानले जाणारे आनंद महिंद्रा यांनाही याच विद्यापीठास कोटभर डॉलर्स देणगीदाखल द्यावेसे वाटले. यावरून या विद्यापीठाची महत्ता ध्यानी यावी. जगभरातील शंभरहून अधिक देशांत या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी, हितचिंतक विखुरलेले असून ट्रम्प यांच्यामुळे विद्यापीठास आर्थिक चणचण जाणवू लागल्यास हे सर्व मदतीस पुढे येतील. याचे कारण उत्तम शिक्षण आणि त्यासाठी आवश्यक निर्भय वातावरण यांची महती ट्रम्प यांस नसली तरी या सर्वांस ती आहे. म्हणून जगातील सर्व लोकशाहीवादी हार्वर्डचे अभिनंदन करतील.

या पार्श्वभूमीवर ‘लोकसत्ता’ने मंगळवारच्या अंकात पहिल्या पानावर प्रसिद्ध केलेली आपल्या शैक्षणिक संस्थांच्या हेळसांडीची बातमी अधिक वेदनादायी ठरते. महासत्ता, जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था इत्यादी इत्यादी होऊ पाहणाऱ्या आपल्या मायभूमीतील काही आयआयटी, आयआयएम अशा महत्त्वाच्या १७ केंद्रीय शिक्षण संस्थांस प्रदीर्घ काळ पूर्णवेळ प्रमुखच नाही. सर्व काही हंगामी. यात ‘बनारस हिंदू विश्वविद्यालय’ही आले. ही आपली शिक्षणाशी असलेली बांधिलकी. अशा वेळी सत्ताधीशांच्या दांडगाईसमोर ठाम उभे राहण्याचे ‘हार्ड वर्क’ अमेरिकेत का असेना कोणी करते ही समाधानाची बाब. तेवढाच आनंद!

## लोकरंजन

### सिनेरंग

### ‘झापुक झुपूक’ सिनेमाचा रोमांचक ट्रेलर झाला रिलीज!!

बाईपण भारी देवा चित्रपटाच्या भरघोस यशानंतर जिओ स्टुडिओज् आणि केदार शिंदे ही सुपरहीट जोडी २५ एप्रिल २०२५ रोजी ‘झापुक झुपूक’ हा कौटुंबीक मनोरंजन करणारा सिनेमा घेऊन पुन्हा एकदा प्रेक्षकांना भेटण्यास येत आहेत. नुकतच या सिनेमाचा धमाल ट्रेलर रितेश देशमुख ने रिलीज केला आहे. आणि रिलीझ होताच हा ट्रेलर सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. विशेष म्हणजे अभिनेता रितेश देशमुखचा सूरज चव्हाण खूप मोठा चाहता आहे आणि आज बिग बॉस सीजन ५ च्या यशानंतर रितेश सूरजच्या या खास क्षणी सामील झाला आहे. दिग्दर्शक केदार शिंदे ह्यांनी बिग बॉस च्या वेळीच सूरज सोबत एक चित्रपट बनवण्याचं ठरवलं होतं आणि आता ते अमलात आणून २५ एप्रिल रोजी फिल्म रिलीज ही होतेय.

सूरज चव्हाण अभिनित ‘झापुक झुपूक’ ह्या सिनेमाचं ट्रेलर आनंदाची मेजवानी घेऊन आलाय. रोमांस, ॲक्शन , ड्रामा या सर्व गोष्टींवर प्रकाशझोत टाकणारा हा चित्रपट आहे. हा ट्रेलर अनेकांचं लक्ष वेधून घेत आहे. विशेष म्हणजे तरुणांमध्ये या सिनेमाची क्रेज जास्त पहायला मिळते. सूरज चव्हाणची स्टाईल आणि धमकेदार डायलॉग्स अख्ख्या महाराष्ट्रात आता गाजणार आहे. ट्रेलर मध्ये दोन कमाल गाण्यांची झलक सुद्धा पहायला मिळते. त्यातील एक गाणं नक्कीच ह्या पुढे हळद गाजवणार. त्याचसोबत सुरज आणि जुई भागवत ची छान जोडी अजून आकर्षक करते. फॅमिली एंटरटेनमेंटचा जबरदस्त तडका असलेल्या "झापुक झुपूक" चित्रपटाची टीम संपूर्ण महाराष्ट्राचं मनोरंजन करायला सज्ज आहे. ‘झापुक झुपूक’ चित्रपटात सूरज सोबत जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे,पायल जाधव,दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत.






### छबी ९ मेपासून संपूर्ण महाराष्ट्रात

कोकणात फोटोग्राफी करणाऱ्या फोटोग्राफरला आलेल्या गूढरम्य अनुभवाची थरारक गोष्ट छबी या चित्रपटातून उलगडणार आहे. या चित्रपटाचा अतिशय रंजक टीझर लाँच करण्यात आला असून, छबी हा चित्रपट ९ मेपासून सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. केके फिल्म्स क्रिएशन, उप्स डिजिटल एंटरटेन्मेंट यांनी "छबी" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. जया तलक्षी छेडा निर्माता आहेत. चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन अद्वैत मसूरकर यांच असून त्यांचा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. चित्रपटात ध्रुव छेडा, सृष्टी बाहेकर, अनघा अतुल, रोहित लाड, ज्ञानेश दाभणे , अपूर्वा कवडे या नव्या दमाच्या कलाकारांसह अभिनेता समीर धर्माधिकारी, अभिनेते मकरंद देशपांडे, अभिनेत्री शुभांगी गोखले, राजन भिसे, जयवंत वाडकर,संकेत मोरे, संजय कुलकर्णी, लीना पंडित असे अनुभवी कलाकार आहेत. त्यामुळे चित्रपटाची अभिनयाची बाजू खणखणीत आहे यात शंका नाही.

फोटोग्राफी स्पर्धेसाठी एक तरूण फोटोग्राफर कोकणातल्या गावात फोटो काढतो. मात्र त्या फोटोमध्ये कुणीच नसतं. हे असं का झालं याचा नाट्यमय शोध "छबी" या चित्रपटात आहे. गूढरम्य आणि नावीन्यपूर्ण कथानक, परिणाकारक पार्श्वसंगीत या मुळे हा टीझर प्रेक्षकांना गुंतवून ठेवतो, तसंच चित्रपटाविषयी उत्सुकताही वाढवतो. आजवर चित्रपटांमधून फोटोग्राफरची, एखाद्या फोटोची गोष्ट फारशी मांडली गेलेली नाही. अशा कथानकाला गूढरम्यतेची पार्श्वभूमी असल्यानं "छबी" हा सध्याच्या चित्रपटांमध्ये नक्कीच वेगळा प्रयत्न ठरणार आहे.



### वध चित्रपटाचा दुसरा भाग लवकरच चित्ररसिकांच्या भेटीला!

२०२२ साली प्रेक्षकांनी पसंतीची मोहोर उमटविलेल्या 'वध' या उत्कंठापटाचा बहुप्रतिक्षित सिक्वेल- 'वध २'चे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. ख्यातनाम अभिनेता संजय मिश्रा आणि प्रसिद्ध अभिनेत्री नीना गुप्ता यांचा कसदार अभिनय पुन्हा एकदा 'वध २' चित्रपटात पाहायला मिळेल- या सिक्वेलमध्ये प्रेक्षकांपर्यंत मूळ चित्रपटाचे सार पुढे नेण्याचा जोमाने प्रयत्न करण्यात आला आहे. 'वध २' चित्रपटातही आत्मनिरीक्षणात्मक स्वर, नैतिक ताण आणि भावनिक गुंतागुंत कायम असल्याचे दिसून येईल. त्याच संकल्पनेद्वारे या चित्रपटाची कथा नव्या रहस्यात कसा प्रवेश करते, हे दिसून येईल.‘वध २’ हा चित्रपट जसपाल सिंग संधू यांनी दिग्दर्शित केला आहे आणि लव रंजन व अंकुर गर्ग यांच्या ‘लव फिल्म्स’द्वारे या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. नीना गुप्ता यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, "इतक्या वेगळ्या आशयाची कथा सापडणे हे खरोखरच दुर्मिळ आहे. जसपाल सिंग संधू यांच्याकडे सत्य आणि ताण यांच्याकडे पाहण्याची दृष्टी आहे, ज्यामुळे ते एक उत्तम कथाकार गणले जातात. ‘वध-२’ या चित्रपटात सहभागी होत पुन्हा एकदा या प्रवासाचा भाग असल्याचा मला खूप अभिमान वाटतो आणि ‘वध २’मध्ये प्रेक्षकांकरता आम्ही बरेच काही सादर करत आहोत, हे लक्षात घेता त्यांच्या प्रतिसादाबाबत मी उत्सुक आहे."‘वध- २’ हा चित्रपट २०२५ साली प्रदर्शित होईल.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

# पत्रकार महेश सदरे यांना मातृशोक



**वडवणी /प्रतिनिधी-**

वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सचिव पत्रकार महेश धोंडीराम सदरे यांच्या आई श्रीमती निलावती धोंडीराम सदरे यांचं (दि. 16 एप्रिल) सकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या 83 वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सचिव पत्रकार महेश सदरे यांच्या मातोश्री श्रीमती निलावती धोंडीराम सदरे वय वर्षे 85 यांचे बुधवारी सकाळी 7 वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले . त्यांच्या पाशच्यात तीन मुले,पत्रकार महेश सदरे,हनुमंत सदरे व सुनील सदरे , सुना, दोन मुली, जावई ,नातु,पनतु असा मोठा परिवार आहे.त्यांच्या निधनाने सदरे कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. श्रीमती निलावती सदरे यांच्या पार्थिवावर बुधवार रोजी दुपारी ३ वाजता वडवणी येथील वैकुंठधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सदरे कुटुंबियांच्या दुःखात दैनिक ... परिवार सहभागी आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# सार्वजनिक बांधकामच्या अधिकाऱ्यां विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी न्यायालयाचे दार ठोठावणार

## जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे जगदिश नरवाडे यांची माहिती

**महागाव प्रतिनिधी**

महागाव ते फुलसावंगी रस्ता निकृष्ट दर्जाचा करणाऱ्या अधिकारी कंत्राटदार यांनी मिलीभगत करून कोट्यवधी रुपयांचा निधीचा अपहार केल्याने त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी तक्रार देवुन सुध्दा गुन्हा दाखल न करण्यात आल्याने न्यायालयीन लढाई लढून त्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल होई पर्यंत माघार घेण्यात येणार नसल्याची माहिती जन आंदोलन आधार संघर्ष समिती संस्थापक अध्यक्ष जगदिश नरवाडे यांनी दिली आहे.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग महागाव अंतर्गत महागाव ते फुलसावंगी या १४ किलोमिटर रस्त्याचे व रस्त्यावरील रपट्टया चे ओबडधोबड निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले याकरिता कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आल्यानंतर ज्यादा रक्कमेचे अंदाज पत्रक बनवुन शासकीय निधीचा अपहार करण्यात आल्याने यांची बाहेरील जिल्ह्यातील सक्षम अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी करण्यात येवुन दोषी असलेल्या अधिकारी,कर्मचारी व कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करून इस्टिमेट नुसार रस्ता पुन्हा करण्याची मागणी जन आंदोलन समितीचे अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी केली या गैर व्यवहारात अधिकाऱ्यांनी आपले हात काळे केल्यामुळे त्यांच्याकडून चौकशी करण्यास टाळाटाळ करण्यात आल्याने नरवाडे यांनी महागाव पोलिसात तक्रार दाखल केली परंतु पोलिसांनी सुध्दा याकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष केल्याने अखेर नरवाडे यांनी न्यायालयाचे दार ठोठावून सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन सर्व अधिकारी,कर्मचारी व कंत्राटदारांवर गुन्हा दाखल करण्यासाठी न्यायालयीन लढाईचे हत्यार उपसले असुन जो पर्यंत या अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर गुन्हा दाखल होणार नाही तोपर्यंत माघार घेतल्या जाणार नाही असा पावित्रा त्यांनी घेतला असुन त्याबद्दलची माहिती पत्रकारांना दिली आहे .

या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पोलिसा कडे तक्रार देऊन केली गुन्हा दाखल करण्याची मागणी. सार्वजनिक बांधकाम उपविभाग महागाव अंतर्गत फुलसावंगी रस्त्याच्या कामात गैरव्यवहार केल्या प्रकरणी यासाठी जबाबदार असलेले तत्कालीन शाखा अभियंता मेहुल भदर्गे,उपविभागीय अधिकारी संजय मंत्री,प्रकाश झळके, कार्यकारी अभियंता प्रिया पुजारी,अधीक्षक अभियंता दिपक सोनटक्के,मुख्य अभियंता गिरीश जोशी,प्रशांत नवघरे, साई शक्ती कंट्रक्शन, श्री गजानन कंट्रक्शन कंपनी पुसद यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी जगदीश नरवाडे यांनी महागाव पोलिसात तक्रार दिली आहे

महागाव फुलसावंगी रस्ता निकृष्ट दर्जाच्या झाल्याने अनेक लोकांचा अपघात होऊन मृत्यू झाला शासनाचे करोडो रुपये पाण्यात गेले त्याला रोडवर जबाबदार असलेले अधिकारी व ठेकेदार यांच्याकडून पुन्हा रस्ता तयार करण्यात यावा किंवा पूर्ण पैसे अधिकाऱ्याकडून वसूल करून ठेकेदारास कळ्या यादीत टाकावे वरील मागणी वारंवार करून न्याय न मिळाल्याने कोर्टात गेल्याशिवाय न्याय मिळणार नाही जगदीश नरवाडे संस्थापक अध्यक्ष जन आंदोलन आधार संघर्ष समिती

# ज्योती दानवे झाली महसूल सहाय्यक अधिकारी



**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या, 2024 च्या परीक्षेत देऊळगाव घाट ची सौ ज्योती राधाकिसन दानवे/शिंदे यांची महसूल सहाय्यक अधिकारी म्हणून निवड झालेली आहे. ज्योतीचे प्राथमिक शिक्षण, व माध्यमिक शिक्षण, श्री ज्ञानेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय देऊळगाव घाट, येथे पूर्ण झाले. त्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण, राजमाता आश्रम शाळा, मराठवाडी येथे पूर्ण केले. त्यानंतर श्री विवेकानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. ज्योतीने 2020 स्पर्धा परीक्षेचा अभ्यास चालू केला. परंतु 2020 साली कोविड मुळे कोणतीही स्पर्धा परीक्षा शासनाने घेतली नाही. पण ज्योतीने अभ्यासाची तयारी सोडली नाही. कारण शांततेच्या काळात जास्त घाम गाळला, तर युद्धाच्या काळात कमी रक्त सांडावे लागते हे ज्योतीने ओळखलं, आणि अभ्यास चालूच ठेवला. जुलै 2024 साली महसूल सहाय्यक अधिकारी या पदासाठी पेपर दिला, आणि ती त्यामध्ये उत्तीर्ण झाली. एक सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगी आज एक महसूल सहाय्यक अधिकारी पदापर्यंत गेली, त्यामागे तिची मेहनत, जिद्द, चिकाटी, सातत्य खडतर परिश्रम, हे होते. ज्योतीने ना कुठलाही क्लास, न लावता एवढ्या मोठ्या पदापर्यंत मजल मारली आहे. त्यामुळे ज्योती वरती शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# प्रभाग क्रमांक १२३ मध्ये नालेसफाई संथ गतीने,नालेसफाईच्या कामावर प्रश्नचिन्ह ;

## नालेफाईची कामे फक्त कागदावरच ?

**मुंबई,(केतन भोज)**

मुंबईत पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी साचू नये,म्हणून मुंबई महापालिकेतर्फे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई केली जाते.यासाठी पालिका कोट्यावधी रुपये खर्च देखील करते.तसेच यंदा मुंबई महानगरपालिका एन विभागाकडून नालेसफाईचे टेंडर निघून नालेसफाई सुरू झाली असली तरीही,प्रभाग क्रमांक १२३ मध्ये अद्याप हवी तशी गती नालेसफाईला मिळाली नसून,येथील नालेसफाईचा कंत्राटदार जाणीवपूर्वक नालेसफाई मध्ये वेळकाढूपणा करताना दिसत आहे.तसेच प्रभागात अद्यापही हवी तशी नालेसफाई झालेली दिसत नसून,सर्व ठिकाणी विभागात नाल्यातील गाळ तसाच पडून आहे.त्यामुळे पावसाळ्याआधी नालेसफाई पूर्ण होणार का,असा प्रश्न निर्माण झाला असून पावसाळयाआधी नालेसफाई पूर्ण होण्याची शक्यता धूसरच आहे.एन विभाग प्रभाग क्रमांक १२३ मध्ये बहुतांश डोंगराळ भाग आहे.त्यामुळे

वेळेपूर्वी याठिकाणी नालेसफाई न झाल्यास पावसाळ्यात नाले तुंबून नागरिकांच्या घरात हे नाल्याचे सांडपाणी शिरण्याची शक्यता नाकारता येत नाही.तसेच नाल्यातील हा गाळ उद्या पावसाळ्यात रस्त्यावर येऊन याचा नाहक त्रास नागरिकांना होऊ शकतो.याशिवाय या भागात मोठ्या प्रमाणावर शाळा देखील असून पावसाळ्यात शाळकरी मुलांना रस्त्यावरून येजा करताना नाल्यातील गाळ रस्त्यावर आल्यामुळे त्रास सहन करावा लागू शकतो.तसेच योग्य प्रकारे नालेसफाई न झाल्यास पावसाळ्यात याठिकाणी रोगराईला देखील निमंत्रण मिळू शकते.नागरिकांच्या कररूपी पैशातून पालिका प्रशासन ही कामे दरवर्षी करत असते.त्यामुळे याठिकाणी संबंधित नाले सफाईचा कंत्राटदार आणि पालिका प्रशासन मात्र बेजबाबदारपणे वागत असल्याचे चित्र दिसत आहे.त्यामुळे प्रभाग क्रमांक १२३ मध्ये नालेसफाई फक्त कागदावर न होता प्रत्यक्ष होणे देखील गरजेचे आहे. अन्यथा अशा बेजबाबदार नालेसफाईच्या कंत्राटदारावर कारवाई करून कायमस्वरूपी ब्लॅकलिस्ट मध्ये टाकावे अशी मागणी स्थानिक नागरिक तसेच सामाजिक कार्यकर्ते करताना दिसत आहेत.



# सरस्वती नदीत बांधण्यात आलेले शॉपिंग कॉम्प्लेक्स काढून टाकण्यात यावे




## अश्विन मोगरकर यांनी दिले मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**परळी- प्रतिनिधी**

परळी शहरातील अंबेवेस भागातील सरस्वती नदीतील शॉपिंग कॉम्प्लेक्समुळे पावसाळ्यात गावभागाला पुराचा धोका निर्माण होतो. या बांधकामामुळे पावसाळ्यात कचरा अडकून लोकांच्या घरात पाणी घुसले आहे. अंबेवेस परिसरात यामुळे नदीत कचरा साचल्याने दुर्गंधी पसरत आहे तसेच डासांचाही त्रास वाढला आहे. हा धोका टाळण्यासाठी सरस्वती नदीत बांधण्यात आलेले शॉपिंग कॉम्प्लेक्स काढून टाकण्यात यावे या मागणीसाठी परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना परळी येथील सामाजिक कार्यकर्ते अश्विन मोगरकर यांनी निवेदन दिले.

# " मी रमाई बोलतेय" या नाटकाने, परळी भिमजयंती महोत्सवाची सुरुवात



**परळी / प्रतिनिधी**

राष्ट्रनिर्माता डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक आदर्श जयंती उत्सव समिती परळीच्या वतीने '' परळी भिमजयंती महोत्सव 2025 चे भव्य असे आयोजन करण्यात आले असून, त्या महोत्सवाची सुरुवात परळी शहरातील सर्व जयंती उत्सव समितीं च्या अध्यक्षांच्या व आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत या महोत्सवाचे उद्घाटन संपन्न झाले. या महोत्सवाच्या पहिल्या दिवसीच '' मी रमाई बोलतेप'' या एकपात्री प्रयोगाने डॉ वैभवी कांबळे यांच्या भूमिकेतून साकारलेले नाटक यशस्वी संपन्न झाले, याप्रसंगी तुफान गर्दीने मैदान भरलेले होते. लोकांनी या प्रसंगी भरभरून अभिनयाला दाद दिली 16 ते23 एप्रील या काळात अनेक व्याख्याने, भिम गीत आकेस्ट्रा असे कार्यकम होणार असल्याचे संयोजन समितीने सांगितले.

## ऑलिम्पिक वीर अविनाश साबळे यास राज्यस्तर शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार

**बीड प्रतिनिधी**

ऑलिम्पिक मधून बीडचे नाव जगाच्या पातळीवर नेणाऱ्या अविनाश साबळे याला शिवछत्रपती राजे क्रीडा पुरस्कार जाहीर झाला असून उद्या शुक्रवार दिनांक 18 एप्रिल रोजी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार त्याला दिला जाणार आहे. म्हाळुंगे - बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे सकाळी 11 वाजता हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. रुपये 3 लाख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अविनाश साबळे सध्या भारतीय सैन्य दलात कार्यरत असून बंगलूरु येथील सदर्न साई सेंटर येथे प्रशिक्षण घेत आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रा.जे. पी. शेळके तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर आदींनी साबळे यांचे अभिनंदन केले आहे.

# रिळे सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी चंद्रकांत गुरव

**शिराळा / प्रतिनिधी**



रिळे सर्व सेवा सोसायटीच्या व्हाइस चेअरमनपदी चंद्रकांत हरी गुरव यांची एक मताने निवड झाली. उपाध्यक्ष बापू हरी पाटील यांनी राजीनामा दिल्याने व्हाईस चेअरमन निवडीचा कार्यक्रम जाहीर झाला होता.

यावेळी माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांचे खंदे समर्थक चंद्रकांत हरी गुरव यांचा एकमेव अर्ज आला. आणि त्यांची व्हाईस चेअरमनपदी निवड जाहीर करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक अंकुश इंगवले आणि अरविंद लाड यांनी कामकाज पाहिले. यावेळी चेअरमन संपतराव पाटील, संचालक दीपक पाटील, कृष्णदेव पाटील, दीपक खामकर, प्रकाश सपकाळ, शिवाजी पाटील, कृष्णदेव खोत, सर्जेराव आढाव, सुनंदा पाटील, विमल डिसले, दिलीप पाटील, आनंदा सपकाळ, पोलिस पाटील सुधीर पवार, सचिव शशिकांत नाठवडे शंकर नाईक आदी उपस्थित होते. व्हाईस चेअरमनपदी चंद्रकांत गुरव यांची निवड होताच कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष केला.

# बनावट कागदपत्रांद्वारे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणी परळी पोलिस स्टेशन मध्ये 14 जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**पान 1 वरून**

■ 11) संचिका क्रमांक 1094 अर्जदार नितीन राजाभाऊ पौळ रा. सिरसाळा याचे वर्धमान हॉंस्पीटल सिरसाळा येथील जन्म नोद प्रमाणपत्र आडगाव ता. माजलगाव येथील असुन व शपथपत्रा मध्ये राहते घरी सिरसाळा येथे जन्म झाल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये तफावत दिसुन येते

■ 12) संचिका क्रमांक 845, संचिका क्रमांक 839, संचिका क्रमांक 838 सर्वांचे अर्जदार एकच अलीम अब्दुल सय्यद रा. परळी यांचे असुन त्याचे सही मध्ये तफावत असल्याचे दिसुन येत असुन दोन अर्जाचे शपथपत्र दिनांक विनास्वाक्षरी सादर केले.

■ 13) संचिका क्रमांक 1089 अर्जदार शेख फारुख खमरोद्दीन रा परळी याचे रहीवाशी छत्रपती संभाजीनगर असुन त्यांचे वडीलांचे मृत्यु परळी येथे राहते घरी मयत झाल्याने नमुद केले आहे. परळी येथील रहिवासा बाबत व मृत्यू बाबत कुठलाही पुरावा नाही.

■ 14) संचिका क्रमांक 1091 अर्जदार मो. अबदुस समदखान खालेद पि. मो. अब्दुल रहेमान खान रा. सिरसाळा याचा रहीवास हैद्राबाद येथील असुन वडील अब्दुल रहेमानखा उर्फ पाशा इब्राहीम साब असे टाकुन त्यांचे स्वतः किंवा वडीलांचे सिरसाळा येथील रहीवास बाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच वडीलांचे नाव अब्दुल रहेमानखा असे असतांनी उर्फ पाशा ईब्राहीमसाब असे टाकुन त्याबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच तहसील कार्यालय परळी वैजनाथ येथे अर्जदार यांनी जन्म/मृत्यु प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेले अर्जाची सविस्तर छाननी चालु असुन त्यात दोषी आढळुन येणा-या अर्जदारा विरुध्द सदर गुन्ह्यात तक्रार समाविष्ट करुन घेण्यात आली आहे.

# निखिल बबन पगारे याने मंथन प्रज्ञाशोल परीक्षेत राज्यस्तरावर पटकावला पाचवा क्रमांक

**आष्टी प्रतिनिधी**



आष्टी तालुक्यातील पंडित जव्हारलाल नेहरू विद्यालयातील विद्यार्थी निखिल बबन पगारे याचा मंथन प्रज्ञाशोल परीक्षेत राज्यस्तरावर पाचवा क्रमांक आला असून त्याने घवघवीत यश संपादन केले आहे. निखिलचा मंथनच्या परीक्षेत राज्यस्तरीय पाचवा क्रमांक आल्याबद्दल, आष्टी तालुक्यातून व पंडित नेहरू महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंदांकडून, व वाहिरा पंचकृषीतून घवघवीत यश मिळाल्याबद्दल निखिल ते कौतुक केले जात आहे






# परळीत ईद मिलन तसेच सद्भावना संमेलन उत्साहात संपन्न

## विश्वातील साऱ्या मानवांचे नाते हे रक्ताच्या नात्याइतकेच घट्ट आणि जवळचे आहे : मुजीब देवणीकर सर

**परळी- प्रतिनिधी**

परळीत येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील विशेष अतिथी विश्राम गृह येथे संपन्न झालेल्या ईद मिलन तसेच सद्भावना संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून मुजीब देवनिकर सर, प्रमुख पाहुणे म्हणून परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर, भरत महाराज गुट्टे, सदभावना मंच परळीचे अध्यक्ष प्रा.एम.एल.देशमुख, हजरत मौलाना तैमूर मिल्ली साहेब, सय्यद इफ्तेखर सर (जिल्हा अध्यक्ष जमाते हिंद), या सह अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

उत्साहपूर्ण संपन्न झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे सामाजिक सलोख्यासाठी घेतलेला हा कार्यक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगत समाजातील गढूळ वातावरण सलोख्याचे होण्यासाठी घेण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. माणसाने माणसांमधील स्वतःचे अस्तित्व शोधायचे आहे, हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे भरत महाराज गुट्टे म्हणाले. सद्भावना संमेलनास आलेल्या सर्वांचे स्वागत सय्यद इफ्तेखर सर यांनी आपल्या मनोगतातून केले.

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते मुजीब देवणीकर सर यांनी सांगितले की आज साऱ्या मानवा करिता समाज टिकवण्याकरिता व देश टिकवण्याकरिता सद्भावनेचे फार महत्त्व आहे. सद्भावने शिवाय कोणताही देश प्रगती करू शकत नाही. यासाठी त्यांनी पैगंबर यांचे उदाहरणही दिले. ईद साजरी करण्यामागचा उद्देश रमजान रोजा याचा इतिहास व वास्तविकताही त्यांनी वर्णन केली. साऱ्या विश्वातील मानवांचे मूळ एक पुरुष आणि एक स्त्री आहे. या नात्याने विश्वातील साऱ्या मानवांचे नातं हे रक्ताचे नातं असल्याचंही त्यांनी सांगितले. माणसाने आपल्या जीवनाचा उद्देश जाणला पाहिजे आपला निर्माण करता या जगात कर्म करण्यासाठी आपणाला पाठवलं आहे त्याला जाणलं पाहिजे आणि त्याची आज्ञाही पाळली पाहिजे. माणसाला नीतिमान बनवण्याचं कार्य रमजान महिना करतो म्हणून या रमजान महिन्यात मुस्लिम बांधव सदाचरण करण्याचा पूर्ण प्रयत्न करतात. उद्या मरणोपरांत जीवनात आपल्या जीवनातील प्रत्येक कर्माचा जाब अल्हासमोर द्यावा लागेल ही जाणीव ही त्यांनी करून दिली. परळी शहरातील हास्तुत्य उपक्रम इतरत्र सर्वत्र व्हावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास समाजातील सर्व घटकातील बांधवांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार शेख साबेर सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी शिरखुर्मा चा स्वाद घेतला.

# अंबाजोगाईचे भूमिपुत्र डॉ . संदेश सुराणा यांची द युरोलॉजी सोसायटी पुणे, च्या सचिव पदी निवड

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

अंबाजोगाई शहरातील जेष्ठ पत्रकार स्वर्गीय लालचंद खुराणा व आदर्श शिक्षिका श्रीमती लिलाबाई सुराणा यांचे सुपुत्र सध्या पुणे येथे कार्यरत असणारे अंबाजोगाई शहराचे भूमिपुत्र डॉ. संदेश लालचंद सुराणा यांची द युरोलॉजी सोसायटी पुणे या संघटनेच्या सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. अंबाजोगाई शहर हे नवरत्नांची खान आहे. या शहराने देशास अनेक दिग्गज विभूती दिल्या आहेत. यातच डॉ संदेश सुराणा यांची भर पडल्याने अंबाजोगाई शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

द यूरोलॉजी सोसायटी पुणे ही मूत्रपिंड शल्य चिकित्सक यांची संघटना आहे. याद्वारे आरोग्य क्षेत्रात विविध उपक्रम राबविले जातात. नुकतीच या संघटनेची बैठक संपन्न होवून यामध्ये संघटनेच्या पुणे शहराच्या सचिवपदी डॉ. संदेश सुराणा यांची एकमताने बिनविरोध अशी निवड करण्यात आली. द यूरोलॉजी सोसायटी पुणे ही एक नामांकित ऑर्गनायझेशन आहे. पुणे शहरांमध्ये सर्व न्यूरोलॉजिस्ट म्हणजेच मूत्र विकार



तज्ञ यांची ही संघटना आहे. डॉ. संदेश सुराणा हे अंबाजोगाई शहरातील प्रख्यात पत्रकार स्व. लालचंद सुराणा व आदर्श शिक्षिका लीलाबाई सुराणा यांचे सुपुत्र आहेत. द युरोलॉजी सोसायटी ही संघटना १९९२ साली स्थापन झाली आहे. या संस्थेची तथा संघटनेची पुण्यासोबतच संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण घेत असलेल्या तसेच शिक्षण पूर्ण होऊन मुत्र विकार क्षेत्रातील कार्य करत असलेल्या डॉक्टरांच्या अडीअडचणी तसेच रुग्णांच्या अडचणी विषयी वेळोवेळी विचारविनिमय केले जातात. संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या बैठकीमध्ये आपल्या ज्ञानाची दिवाण-घेवाण केली जाते तसेच नवनवीन माहितीवर चर्चा केली जाते. मागील १० वर्षापासून डॉ. संदेश सुराणा हे या संस्थेशी जोडले गेले आहेत. त्यांनी पहिल्यांदा कौन्सिल मेंबर नंतर खजिनदार म्हणून देखील या संस्थेत आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पडली आहे. संघटनेत त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांची संघटनेचे सचिव या पदासाठी सर्वानुमते व बिनविरोध अशी निवड करण्यात आली आहे. डॉ. संदेश सुराणा हे पुण्यामध्ये रुग्णसेवेच्या माध्यमातून आपले कर्तव्य बजावत आहेत. त्यांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगवेगळे वर्कशॉप घेऊन अनेक रुग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया केल्या आहेत . आपले कौशल्य, ज्ञान आणि बुद्धिमत्तेचा वापर करून ते आज पुण्यासारख्या महानगरात यशस्वी डॉक्टर तथा एक यशस्वी न्यूरॉलॉजिस्ट म्हणून सुपरिचित झाले आहेत. ते पुना हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर तसेच संजीवन हॉस्पिटल च्या माध्यमातून रुग्णसेवा करत आहेत.

# एका शाळकरी विद्यार्थ्यासाठी एस .टी फिरली मागारी कर्तव्यावर अशी ही माणुसकी : शिक्षणप्रेमींनी केले स्वागत

**परळी / प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील असंख्य विद्यार्थी हे एस.टी बस मधून शाळेला ये-जा करतात. एकीकडे जाणीवपूर्वक या शाळकरी विद्यार्थ्यांना पाहून एस. टी बस उभी करण्याचे टाळत असल्याचे प्रकार नित्याचेच असताना गुरुवारी एका शाळकरी मुलाला घेण्यासाठी परळी आगाराच्या वाहक आणि चालकांनी पुढे निघालेली एस.टी बस चक्क 200 मीटर पेक्षा अधिक अंतर रिव्हर्स घेत मुलाला एस.टी बस मध्ये घेत त्याला शाळेच्या ठिकाणी पोहच केले. कर्तव्यावर असताना देखील आपल्यातील माणुसकी दाखवल्या बद्दल परळीतील पत्रकार अनुप कुसुमकर यांच्या प्रयत्नाने शिक्षणप्रेमी, एस.टी कामगार संघटना व विद्यार्थ्यांनी या वाहक-चालकाचा आगारात सत्कार करून अभिनंदन केले.



नित्यनियमाने गुरुवार दि 17 रोजी परळी आगाराची आज MH-14 -BT-1716 हि एस.टी बस परळी ते कवडगाव या दरम्यान प्रवास करत असताना. तळेगाव या ठिकाणाहून पुढे गेली याच वेळी तळेगाव येथील 11-12 वर्षाचा एक शाळकरी मुलगा पाठीवर दफ्तर, हातात टिफिन बॅग घरून बस पुढे गेली म्हणून परीक्षेला जाण्यासाठी बस मागे धावत सुटला. बस मागे विद्यार्थी धावत आहे हे चालकाच्या व वाहकाच्या लक्षात आल्यास बसचे चालक रामदास गीते (बॅच नंबर 475 ) व वाहक संदिपान मुंडे ( क्रमांक 26910 ) यांनी एस.टी बस सुमारे 200 मीटर पेक्षा अधिक अंतर बस रिव्हर्स घेऊन त्या विद्यार्थ्याला आदराने बस मध्ये बसवले. सदरील प्रकार परळीतील पत्रकार मित्र अनुप कुसूमकर सर यांच्या निदर्शनास आले. त्यांनी याबाबत परळी आगार, एस.टी कामगार संघटना व शिक्षण प्रेमी यांना कल्पना देत या चालक आणि वाहक यांना रोख रक्कम व सत्काराचे नियोजन करत अभिनंदन करण्याचे नियोजन केले. सदरील एस.टी बस परळी आगारामध्ये सकाळी 10 वाजता वापस आली असता तितक्याच आदराने व सन्मानाने स्वागत केले. याप्रसंगी शिक्षण प्रेमी केशवराज मुंडे, एसटी संघटनेचे कार्यकर्ते रामकृष्ण कोरडे व एस.टी बसने प्रवास करणारे विद्यार्थी आदींच्या उपस्थितीत विद्यार्थ्याबद्दल दाखवलेल्या प्रेमाबद्दल चालक व वाहक यांचे स्वागत करून अभिनंदन केले.

# अंबाजोगाई महाराष्ट्रातले तिसरे पुस्तकांचे गाव म्हणून जाहीर : उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ .उदय सामंत यांची घोषणा

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

समस्त अंबाजोगाईकरांची बऱ्याच दिवसांपासूनची मागणी होती की, अंबाजोगाई शहर हे पुस्तकांचे गाव जाहीर करावे. याकरिता अंबानगरीचे भाग्यविधाते तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी यांनी राज्यशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी वैयक्तिकरित्या कॅबिनेट मंत्री ना.उदय सामंत यांच्याकडे व माजी मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे जुलै २०२४ मध्ये ही पत्राद्वारे मागणी केली होती. त्यामुळेचराजकिशोर पापा मोदी यांच्या पाठपुराव्याला अखेर यश प्राप्त झाले असून सोळा एप्रिल रोजी बीड शहरात उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत हे आले असता त्यांनी अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे जाहीर केले. यावेळी माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यासह आद्यकवी मुकुंदराज ट्रस्टचे अध्यक्ष ह भ प किसन महाराज पवार, बीडच्या प्राचार्या डॉ दिपाताई क्षीरसागर, जेष्ठ साहित्यीक सतीश साळुंके, कवी साळगांवकर, अतुल कुलकर्णी, संजय देवळनकर, शिवसेनेचे सचिन मुळुक, अनिल जगताप हे प्रामुख्याने उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती देताना माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, मुकुंदराज संस्थानचे किसन महाराज पवार यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहर हे आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्य, नाट्य, क्रीडा, सहकार, ग्रंथ, परिवर्तनवादी चळवळीचे केंद्र

आहे. येथे मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांची समाधीस्थळ आहे. ग्रामदेवता माता श्री योगेश्वरी चे मंदिर आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहर हे पर्यटनदृष्ट्या सक्षम असून लेखक, साहित्यिक व वाचन प्रेमी वर्ग या शहरात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. वाचन संस्कृतीला बळ देणारे असे विविध उपक्रम वर्षभर अंबाजोगाईमध्ये राबविले जातात.

अंबाजोगाई ही मराठी भाषेचे आद्य कवी मुकुंदराज, प्रकांड पंडित सर्वज्ञ दासोपंत यांची कर्मभूमी आहे. तसेच कोकणस्थांची कुलदेवता माता योगेश्वरी देवी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेलं गाव आहे.

नैसर्गिक विविधतेने नटलेले गांव आहे. नदी, डोंगर, वनराई, पशु पक्षी यासोबतच मंदिराचे गांव म्हणून अंबाजोगाईची ओळख आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याचे नेतृत्व ज्यांनी केले ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या लोककार्याची साक्ष देणारे हे गांव आहे. दिवंगत नेते



**आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार ; माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार**

---------------

**अबांनगरीचे भाग्यविधाते राजकिशोर मोदी यांच्या पाठपुराव्याला अखेर यश ; अंबाजोगाईकरांच्या वतीने सातत्याने केली होती निवेदनाद्वारे मागणी**

प्रमोदजी महाजन, दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे, माजी खासदार बापूसाहेब काळदाते, माजी आमदार बाबुरावजी आडसकर, डॉ.द्वारकादास लोहिया, भगवानराव लोमटे बापू, डॉ.व्यंकटराव डावळे, रामकाका मुकादम यांच्यासह अनेक मान्यवरांनी विविध क्षेत्रात अंबाजोगाईचा लौकिक सर्वदूर पसरला आहे. ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ तिवारी, अमर हबीब, स्व.शैलाताई लोहिया, डॉ.नागरगोजे, दिनकर जोशी, दगडू लोमटे, बालाजी सुतार, मुकूंद राजपंखे, प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे,प्रा किरण कांबळे, प्रा.गौतम गायकवाड, बलभीम तरकसे, विश्वांभर वराट गुरूजी, स्व. प्रा.संभाजी सावळकर यांनी अंबाजोगाई साहित्य संमेलन चळवळीला बळ दिले आहे.

अंबाजोगाई शहरात बालझुंब्बड' सारखा उपक्रम मागील अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. 'बालझुंब्बड' मुळे नव्या पिढीला एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. 'बालझुंब्बड' ने हजारो विद्यार्थी घडविले आहेत. हे विशेष होय.

अशा वैविध्यपूर्ण बाबींमुळे अंबाजोगाई शहर हे तिसरे पुस्तकांचे गाव समस्त अंबाजोगाईकरांच्या मागणीला मिळालेलं हे सर्वांत मोठं यश असून ही आपल्या सर्वांसाठीच आनंदाची बाब आहे. अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत बीड येथे बुधवार, दिनांक १६ एप्रिल रोजी जाहीर केल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर मुकुंदराज समाधी परिसर हे पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करावे व यासाठी वन विभागाकडील पाच एक्कर जागा ही मुकुंदराज संस्थानला उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर देखील वनमंत्री ना. गणेश नाईक यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन यावर देखील सकारात्मक निर्णय घेण्याचा शब्द ना. उदय सामंत यांनी याप्रसंगी दिल्याचे राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. त

्याचबरोबर विवेकसिंधु हा ग्रंथ महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रसिद्ध करून तो ग्रंथ राज्यातील प्रत्येक वाचनालयात ठेवण्याची मागणी जेष्ठ साहित्यिक साळेगावकर यांनी यावेळी केली व ती मागणी देखील उदय सामंत यांनी तात्काळ मान्य केल्याचे मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई करांच्या या सर्व मागण्यांची पूर्तता केल्याबद्दल महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत, माजी मंत्री दीपक केसरकर व माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे राजकिशोर मोदी व मुकुंदराज संस्थानचे किसन महाराज पवार यांनी समस्त अंबाजोगाईकरांच्या वतीने आभार व्यक्त केले आहेत.

# औष्णिक विद्युत केंद्र कर्मचारी प्राथमिक ग्राहक भंडार सहकारी संस्था मर्या .च्या चेअरमनपदी राहुल मुंडे यांची बिनविरोध निवड

**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

महाराष्ट्र वीज कामगार महासंघ परळी वैजनाथचे झोन सचिव राहुल मुंडे यांची औष्णिक विद्युत केंद्र कर्मचारी प्राथमिक ग्राहक भंडार सहकारी संस्था मर्या. परळी वैजनाथच्या "चेअरमन"पदी निवड झाली. नवनिर्वाचित चेअरमन राहुल मुंडे यांच्या निवडीबद्दल मित्र परिवाराकडून सत्कार व अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील औष्णिक विद्युत कर्मचारी प्राथमिक ग्राहक भंडार सहकारी संस्था मर्यादितची चेअरमनपदाची दोन वर्षासाठीची निवडणूक प्रक्रिया पार पडली. यासाठी एकमेव संचालक राहुल मुंडे यांचा अर्ज दाखल झाल्याने चेअरमनपदी राहुल मुंडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. चेअरमनपदाची निवडणूक प्रक्रियासाठी निवडणूक अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक श्री चव्हाण यांनी कामकाज पहिले. चेअरमन पदाची निवडणूक प्रक्रिया दरम्यान सर्व संचालक मंडळ उपस्थितीत होते. दरम्यान राहुल मुंडे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

राहुल मुंडे हे टोकवाडी येथील महानिर्मिती एम एस ई बी कर्मचारी कै.एल पी मुंडे यांचे सुपुत्र आहेत. तसेच महाराष्ट्र वीज कामगार महासंघचे झोनल सचिव राहुल मुंडे यांनी महाराष्ट्र वीज कामगार महासंघच्या आंदोलन असो कुठल्याही कर्मचारी वर्गाचे प्रश्न सोडवण्यासाठी नेहमीच अग्रेसर, महाराष्ट्र वीज कामगार महासंघात गेल्या १० वर्षांपासून सदस्यापासून झोनल सचिवसह अनेक पदांवर प्रामाणिक पणे काम, कर्मचारी यांचे प्रशासकीय इतर तसेच कार्यालयात आलेल्या सर्व समस्या असो किंवा प्रश्न सोडवण्यासाठी अग्रेसर व सदैव तत्पर असतात, कर्मचारी सोसायटी ऑडिट वर्ग क वरून ऑडिट वर्ग अ आणण्यामध्ये यांचे खरीचा वाटा आहे. संप व आंदोलनात नेहमीच सहभागी



असतात. कामगारांचे प्रश्न सोडविणे व महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे कार्य मजबुत करण्यासाठी सतत कार्यरत राहून नेहमीच तळागाळापर्यंत महासंघाचे कार्य पोहचविण्यासाठी प्रयत्नशील राहतात. टीपीएस कॉलनी मध्ये सर्व कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंद होतात, कर्मचारी सोसायटीमध्ये सर्वात कमी वयाचे चेअरमन, सर्वाधिक 354 मतदान घेऊन ते संचालक झाले होते. त्यांच्या सर्व कार्याची व निःस्वार्थ पणे केल्या कमाची पावती मिळाली आहे. औष्णिक विद्युत केंद्र कर्मचारी प्राथमिक ग्राहक भंडार सहकारी संस्था मर्या.च्या"चेअरमन"पदी राहुल मुंडे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

राहुल मुंडे म्हणाले की, माझी औष्णिक विद्युत केंद्र कर्मचारी प्राथमिक ग्राहक भंडार सहकारी संस्था मर्या. च्या"चेअरमन"पदी निवड केल्याबद्दल मी सर्व वरिष्ठ, संचालक व मित्र परिवाराचे व महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे सर्व पदाधिकारी यांचे आभार मानतो. माझ्यावर सोपविलेली जबाबदारी व केलेली निवड सार्थ ठरविण्यासाठी सर्वना सोबत घेऊन व मार्गदर्शनाखाली काम करू तसेच कोणत्याही कर्मचारी वर्गावर अन्याय होऊ देणार नाही, सर्वांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध राहिल असे ते म्हणाले. या निवडीबद्दल औष्णिक विद्युत केंद्र कर्मचारी प्राथमिक ग्राहक भंडार सहकारी संस्था मर्या.च्या"चेअरमन"पदी नवनिर्वाचित राहुल मुंडे यांचे सर्व वरिष्ठ कार्यकारिणी, झोन कार्यकारिणी व सर्व सभासद तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी, शैक्षणीक, पत्रकार, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, मित्र परिवार व नातेवाईकांकडून स्वागत व सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.